माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १८ अन्वये दाखल तक्रार

**क्रमांक-तक्रार-५३/२०२५** दिनांक :- १२/०९/२०२५

श्री. मनोज जनार्दन पाटील,
सर्कल नं. १७/२३, लष्करीबाग,
लेन नं. ७ नागपूर-४४००१७ **तक्रारदार**

जन माहिती अधिकारी,
नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, नागपूर (ग्रा), **जन माहिती अधिकारी**

प्रथम अपिलीय अधिकारी,
तहसिलदार, तहसिल कार्यालय, नागपूर (ग्रा) **प्रथम अपिलीय अधिकारी**

तक्रारदार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १८ नुसार आयोगास दि. ०५.०२.२०२५ रोजी (प्राप्त दि. ०७.०२.२०२५) थेट तक्रार अर्ज सादर केला आहे. या तक्रार अर्जामध्ये तक्रारदार यांनी दिनांक १९/०८/२०२४ च्या माहिती अर्जाच्या च्या अनुषंगाने संबंधित जनमाहिती अधिकारी कडून विहीत मुदतीत कोणतीही कार्यवाही, पत्रव्यवहार तसेच आवश्यक माहिती मिळविण्यापासून बाधित झाल्यामुळे दिनांक २६/०९/२०२४ रोजी प्रथम अपिल दाखल करण्यात आले. अपिलावरील सुनावणी प्रक्रिया पार पाडली असल्यास तसेच तहसीलदार, तहसिल कार्यालय, नागपूर (ग्रा) यांनी आदेश/निर्णय पारित केला असल्यास त्याची प्रत पुरविण्याबाबत दिनांक ०८/१२/२०२४ रोजीच्या पत्रानुसार विनंती केल्यानंतरही आजपावेतो सदर आदेश/निर्णयाची प्रत अप्राप्त आहे. करिता कायद्रशीर नियमानुसार शास्तीची शिस्तभंग व दप्तर दिरंगाई, फौजदारी कार्यवाही तसेच मानसिक-शारिरीक त्रासापोटी नुकसान भरपाई ई ची कार्यवाही ची प्रक्रिया प्रस्तावित करणेबाबत, असे नमूद करुन आयोगाकडे कलम १८ अंतर्गत थेट तक्रार अर्ज सादर केला आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये जन माहिती अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित झालेल्या अर्जदारास दाद मागण्याकरिता खालीलप्रमाणे कार्यपध्दती विहीत करण्यात आली आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम -२००५ च्या कलम १९ (१) अन्वये ज्या कोणत्याही व्यक्तीला कलम ७ चे पोटकलम (१) किंवा पोटकलम (३) चा खंड (क) यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वेळेत निर्णय प्राप्त झाला नसेल, किंवा यथस्थिती केंद्रीय जन माहिती अधिकारी किंवा राज्य जन माहिती अधिकारी यांच्या निर्णयाने जी व्यक्ती व्यथित झालेली असेल अशा कोणत्याही व्यक्तीला अशी मुदत संपल्यापासून किंवा असा निर्णय प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या आत प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणांमधील यथास्थिती केंद्रीय जन माहिती अधिकारी किंवा राज्य जन माहिती अधिकारी यांच्यापेक्षा वरिष्ठ दर्जाच्या अशा अधिकाऱ्याकडे अपील करता येईल.

E:\SD \तक्रार शाखा\ \थेट तक्रार आदेश हेमंत गाजरे

माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(६) अन्वये पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) अन्वये केलेले अपील, ते मिळाल्याच्या दिनांकापासून यथास्थिती तीस दिवसांच्या आत किंवा ते दाखल केल्याच्या दिनांकापासून एकूण पंचेचाळीस दिवसांपेक्षा अधिक होणार नाही अशा वाढविलेल्या कालावधीच्या आत, कारणे लेखी नमूद करुन, निकालात काढण्यात येईल.

माहितीचा अधिकार अधिनियम -२००५ च्या कलम १९(३) अन्वये पोटकलम (१) खालील निर्णयाविरुध्दचे दुसरे अपील, ज्या दिनांकास निर्णय द्यायला हवा होता किंवा प्रत्यक्षात मिळाला होता त्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत, केंद्रीय माहिती आयोगाकडे किंवा राज्य माहिती आयोगाकडे दाखल करता येईल.

मा. सर्वोच्च न्यायालय यांनी Chief Information Commissioner -Vs- State of Manipur (AIR २०१२ SC ८६४), यामध्ये सिव्हिल अपील क्रमांक १०७८७-१०७८८/२०११ या याचिकेवर, दिनांक १२.१२.२०११ रोजी दिलेल्या आदेशामध्ये – The nature of the power under Section १८ is supervisory in character whereas the procedure under Section १९ is an appellate procedure and a person who is aggrieved by refusal in receiving the information which he has sought for can only seek redress in the manner provided in the stature, namely, by following the procedure under Section१९. This Court is, Therefore, of the opinion that Section ७ read with Section १९ provides a complete statutory mechanism to a person who is aggrieved by refusal to receive information. Such person has to get the information by following the aforesaid statutory provisions." असे स्पष्ट केले आहे.

मा. सर्वोच्च न्यायालय यांनी दिलेले आदेश (Judgment) लक्षात घेता असे स्पष्ट होते की, केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ मधील तरतुदीनुसार केलेल्या तक्रारी ऐवजी कलम ६ अंतर्गत केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराने व्यथीत झाल्यास, कलम १९ (१) नुसार प्रथम अपील व कलम १९(१) वरील निर्णय मान्य नसेल तर कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल करणे क्रमप्राप्त ठरते.

तसेच ज्या माहिती अर्जाच्या संदर्भात कलम १९ (३) अन्वये आयोगास व्दितीय अपील सादर करण्यात आले आहे व ज्या अपील प्रकरणी आयोगाने पारित केलेल्या आदेशाची अंमलबजावणी झाली नाही, अशा प्रकरणी तक्रारदार यांनी कलम १८ अंतर्गत तक्रार दाखल करणे अपेक्षित आहे.

तक्रारदार यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या तक्रारीचे अवलोकन केले असता आयोगास असे निदर्शनास आले आहे की तक्रारदार यांनी कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील केल्यानंतर आयोगाकडे कलम १८ अन्वये थेट तक्रार अर्ज केला आहे. यावरुन असे दिसून येते की, त्यांनी कलम १९ (३) नुसार आयोगाकडे व्दितीय अपिल केलेले नाही त्यामुळे तक्रारदार यांनी कलम १९ (३) अंतर्गत उपलब्ध असलेल्या संपूर्ण वैधानिक कार्यप्रणालीचा अवलंब न करता कलम १८ चा वापर केला आहे.

तक्रारदार यांची कलम १९(३) अंतर्गत कार्यप्रणालीचा अवलंब न करता अशा पध्दतीने तक्रार दाखल करण्याची कृती मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार विसंगत ठरते.

तसेच तक्रारकर्ता यांच्या दि. ०५.०२.२०२५ रोजीच्या तक्रार अर्जानुषंगाने आयोगाने प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय, नागपूर (ग्रा) व जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, नागपूर (ग्रा) यांना दि. २८.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये

दि. १९.०८.२०२४ रोजीच्या माहिती अर्जासंदर्भात व दि. २६.०९.२०२४ रोजी दाखल केलेल्या प्रथम अपिल अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगास सादर करण्याबाबत कळविले. त्यानुषंगाने प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, नागपूर (ग्रा) यांनी आयोगास दि. २५.०४.२०२५ रोजी अहवाल सादर केला. सदर अहवालानुसार जनमाहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांना दि.२८.०८.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद दिला आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २६.०९.२०२४ रोजीच्या अपिल अर्जावर दि.०७.१०.२०२४ रोजी सुनावणी घेवून आदेश पारित केल्याचे आयोगास कळविले.

सबब, जनमाहिती अधिकारी यांनी माहिती अर्जानुसार तक्रारकर्ता यांना प्रतिसाद दिला असून प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिल अर्जावर सुनावणी घेवून आदेश पारित केले आहे. तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिल आदेशानंतर आयोगाकडे व्दितीय अपिल अर्ज सादर करणे अपेक्षित होते.

वरील बाब विचारात घेता मा. सर्वोच्च न्यायालय यांनी सिव्हिल अपील क्र. १०७८७-१०७८८/२०११ या याचिकेवर दिलेले आदेशानुसार तक्रारदार यांनी कलम १८ अंतर्गत केलेल्या थेट तक्रार अर्जावर कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

## आदेश

प्रस्तुत थेट तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

GSNimdeo
**(गजानन निमदेव)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण :** **नागपूर**
**दिनांक :** **१२/०९/२०२५**

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर ★ नागपूर ★

**जा.क्र.**5143**दि.**------------

8 OCT 2025

E:\SD \तक्रार शाखा\ \थेट तक्रार आदेश हेमंत गांजरे\